## कौ. हि. म. सं. अर्ज क्र.५५/२०२३ मधील नि.क्र.४ खालील आदेश

प्रस्तुत अर्ज, अर्जदार हिने महिलांचे घरगुती हिंसाचारापासून संरक्षण अधिनियम कलम २३ नुसार दाखल केलेला आहे.

### अर्जदार हिचे अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे –

२. अर्जदार व सामनेवाला क्रं.१ यांचा विवाह दि.१२/०७/२०१६ रोजी झालेला असुन सामनेवाली क्रं.२ ही अर्जदाराची सासु आहे. सदर लग्न संबंधातुन कोणतेही अपत्य झालेले नाही. लग्नानंतर अर्जदार ही सामनेवाले यांच्याकडे नांदावयास गेली. परंतु सामनेवाला क्रं.१ हा अर्जदारासोबत बोलत नव्हता. तसेच सामनेवाली क्रं.२ ही अर्जदार हिस मासिक पाळी वरुन बोलुन अपमाणित करित होती तसेच घरातील कामे मोलकरणीसारखे करुन घेवुन शिळे अन्न खाण्यासाठी देत होती. सामनेवाला क्र्.१ हा घटस्फोट घेण्यासाकरिता अर्जदाराचा शारिरिक व मानसिक छळ करु लागला. त्यामुळे सन २०१९ मध्ये माहेरी हाकलुन दिले. त्यानंतर अर्जदाराने नांदण्याचा प्रयत्न केला परंतु सामनेवाले यांनी फारकतीची मागणी केली. तसेच त्यासाठी घटस्फोटाचा अर्ज जळगांव न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार हिस कोणताही कामधं्दा येत नाही. तसेच तिला दरमहा दरमहा रु.२० हजार खर्च येतो. याउलट सामनेवाला क्रं.१

हा गितांजली केमीकल या कपंनीमध्ये नोकरीस असुन त्यास दरमहा रु.४० ऐवढा पगार आहे. तसेच गुलमोहर कॉलनी जळगांव येथे दोन मजली ईमारत असुन रक्कम रु. ४५ हजार भाडे मिळते. त्यामुळे अर्जदार हिस दाखल तारखेपासुन दरमहा रु.२० हजार अंतरिम पोटगी मंजुर करण्यात यावी अशी विनंती केली आहे.

३. सामनेवाला क्रं.१ व २ यांनी निशाणी क्रं.१० वर खुलासा सादर करुन अर्जास हरकत घेतली आहे. सामनेवाले यांचे म्हणणे असे आहे की, अर्जदार व सामनेवाला क्रं.१ यांचा विवाह दिनांक १२/०७/२०१६ रोजी झालेला आहे. अर्जदार हिने प्रथम विवाह विच्छेदनाची कोणतेही कागदपत्रे न दाखविता तोंडी माहिती देवुन सामेनवाला यांची फसवणुक करुन विवाह केलेला आहे. अर्जदार हिने सामनेवाला क्रं.१ याच्याशी कधीही शारिरिक संबंध होवु दिले नाही. अर्जदार ही सहा वर्षापासुन स्वतःच्या मर्जीने माहेरी राहात आहे. अर्जदार ही एकत्रकुटूंबात नांदावयास आली त्यावेळी सामनेवाला क्रं.१, त्याचे आई वडील व भाऊ एकत्रात राहात होते. परंतु अर्जदार ही सामनेवाला क्रं.१ याच्या आई वडीलांचा अपमान करित होती व घरातील कामधंदा करित नव्हती. तसेच सामनेवाला क्रं.१ हा नपुसंक आहे अशी बदनामी करित होती. अर्जदार ही दिनांक १२/०८/२०१६ रोजी सामनेवाला कं.१ याचा त्याग करुन निघुन गेली आहे. सामनेवाला क्रं.१ याने अर्जदार हिस वैदयकिय उपचार घेण्यास सांगितले

परंतु त्या भितीने अर्जदार ही मामाकडे जावुन येते असे सांगुन सर्व दागिने व कपडे लत्ते घेवुन मामाकडे निघुन गेली तेव्हापासुन नांदावयास आलेली नाही. सामनेवाला क्रं.१ याने अर्जदार हिस दिनांक २३/०९/२०२० रोजी नोटीस पाठवुन नांदावयास येण्याचे कळविले परंतु अर्जदार हिने दिनांक २९/०९/२०२० रोजी नोटीस उत्तर दिले परंतु नांदावयास आलेली नाही. अर्जदार ही घटस्फोट घेण्यासाठी रु.१५ लाखाची मागणी करित आहे. सामनेवाला क्रं.१ याने स्वतः व मध्यस्थी मार्फत अर्जदार हिस नांदवण्याचा प्रयत्न केला परंतु त्यास नकार दिला आहे. सामनेवाला क्रं.१ याने दिनांक ०५/१०/२०१६ रोजी भोरगांव येथे पाटीदार लेवा पंचायत पाडळसे यांच्याकडे वैवाहिस जिवन सुरळीत व्हावे याकरिता अर्ज दिला होता परंतु त्यांनी सरकारी दवाखान्यातुन शारिरिक दृष्टया सक्षम असल्याचे प्रमाणपत्र घेवुन येण्यास दोघांना सांगितले. परंतु अर्जदार ही पंचायतीसमोर हजर राहिली नाही. तसेच सामनेवाला क्रं.१ याने दिनांक १२/०७/२०१७, ०५/१२/२०१७ व २१/१२/२०१७ रोजी रजिष्टर पोस्टाद्वारे पत्र पाठवुन नांदावयास यावे म्हणुन प्रयत्न केले परंतु अर्जदाराने त्यास कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. तसेच जळगांव येथे महिला सहाय्यक कक्ष यांच्याकडे दिनांक १३/०१/२०१८ रोजी नांदण्यास यावे याकरिता अर्ज केला परंतु त्या ठिकाणी सुध्दा अर्जदार हजर राहिलेली नाही. अर्जदार ही तिचे शारिरिक दोष लपवण्यासाठी हजर राहात नाही व केवळ आर्थीक व मानसिक त्रास देण्यासाठी खोटे खटले दाखल

करित आहे.

४. अर्जदार ही उच्च शिक्षीत असुन खाजगी संस्थेमध्ये नोकरी करते तिला दरमहा रु.४० हजार पगार मिळतो. तसेच शिकवणी घेते. तिच्यावर कोणीही अवलंबुन नाही. तिने पहिल्या पतीपासुन रु.३ लाख व खर्च घेतलेला आहे. त्या पैशातुन निमखेडी जळगांव येथे प्लॉट घेतलेला आहे तसेच अर्जदार हिच्या नावावर ३ शेत मिळकती असुन तिस भरघोस उत्पन्न मिळते. याउलट सामनेवाला क्रं.१ हा ज्या कंपनीमध्ये कामाला होता त्या कंपनीमध्ये स्फोट झाल्याने ती बंद आहे. सामनेवाला याच्याकडे एकत्रकुटूंबाचे निवासापुरते घर आहे. सामनेवाला क्रं.१ यास पगार व घरभाडे मिळत नाही. याउलट सामनेवाला क्रं.१ याचे वडील वयोवृध्द आहे. तसेच मोठा भाऊ काही कामधंदा करित नाही. सामनेवाला क्रं.१ याच्यावर चार ते पाच लोकांची जबाबदारी आहे. अर्जदार हिस जळगांव येथील कौटूंबिक न्यायालयात दरमहा रु.३ हजार खावटी मंजुर झालेली आहे. ती सामनेवाला नियमितपणे भरित आहे. त्यामुळे अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

५. अर्जदार हिचे अर्जातील कथन, सामनेवाला याचे म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रावरुन खालील मुद्दे विचारार्थी उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष कारणांसहीत खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार हिचा सामनेवाला यांनी शारीरिक व मानसिक छळ केल्याचे सकृतदर्शनी शाबीत केले आहे काय ? | ...नकारार्थी. |
| २. | अर्जदार यांनी मागणी केल्याप्रमाणे सामनेवालाकडून अंतरिम पोटगी मिळणेस पात्र आहे काय ? | ...नकारार्थी. |
| ३. | काय आदेश ? | अंतिम आदेशानुसार. |

## कारणमीमांसा

६. अर्जदार हिने मा. सर्वोच्च न्यायालय यांचा **रजनिशी – वि– नेहा, फौजदार अपील क्र. ७३०/२०२०** मधील निर्देशानुसार मालमत्ता व दायित्वाचे शपथपत्र निशाणी क्र.६ वर सादर केले आहे. सामनेवाला यांनी आपल्या बचावामध्ये एच.एम.पी क्रं.२५४/२०२२ मधील अर्ज व निशाणी क्रं.१६ आदेशाची सत्यप्रत व गट क्रं.२५९ व १००३, २५५ चे ७/१२ उतारे अभिलेखावर सादर केलेले आहे.

७. अर्जदारातर्फे विद्वान विधिज्ञ श्री.एस.टी.खैरनार यांचा युक्तीवाद ऐकला. सामनेवाला यास युक्तीवाद करण्याची संधी देवुनही युक्तीवाद केलेला नाही.

**मुद्दा क्र.१ व २ साठी –**

८. महिलांचा कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण कायदा २००५ च्या कलम

२० नुसार पिडीतग्रस्त महिलांना पोटगी देण्याचा अधिकार न्यायालयाला आहे. तसेच कलम २३ नुसार कलम २० मधील पोटगी ही अर्ज दाखल झाल्यानंतर मुख्य अर्जाचा निकाल लागेपर्यंत अंतरिम स्वरुपात देण्याचा अधिकार देखील आहे. अर्जदार व सामनेवाला यांच्या कथनावरुन दोघांनाही लग्नाद्वारे प्रस्थापित नातेसंबंध व सहभागी निवासस्थानामध्ये राहात असल्याबाबत मान्य असल्याचे स्पष्ट होते. त्यावरुन अर्जदार व सामनेवाला क्रं.१ व २ यांच्यामध्ये कौटूंबिक नातेसंबंध असुन सहभागी निवासस्थानामध्ये राहत होते असे शाबीत होते.

९. अर्जदार हिने सामनेवाला यांच्यावर असा आरोप केला आहे की, ती सामनेवाला यांच्याकडे नांदत असतांना सामनेवाला क्रं.१ हा तिच्याशी बोलत नव्हता तसेच सामनेवाली क्रं.२ ही मासिक पाळीच्या कारणावरुन तिला अपमाणित करित होती व त्या कारणामुळे तिला सन २०१९ मध्ये माहेरी हाकलुन दिले आहे. याउलट सामनेवाला यांनी अर्जदार हिच्यावर असे आरोप केले आहे की, अर्जदार हिच्यामध्ये शारिरिक दोष असल्यामुळे तिने शारिरिक संबंध ठेवुन दिलेले नाही. त्यामुळे विवाहाचा उद्देश सफल झालेला नाही. तसेच तिने प्रथम विवाह बाबतचे कागदपत्र सामनेवाला क्रं.१ पासुन लपवुन ठेवलेले आहे. तसेच त्याबाबत कोणतीही माहिती दिलेली नाही. प्रस्तुत खटल्यामधील अर्जदाराच्या कथनामध्ये देखिल तिचा सामनेवाला क्रं.१ याच्याशी दुसरा विवाह होता असे कोठेही नमुद केलेले नाही. तसेच प्रथम विवाह

बाबतची कोणतीही माहिती दिलेली नाही. त्याबाबत अर्जदार यांच्या विधिज्ञांनी देखिल आपल्या युक्तीवादामध्ये कोणताही स्पष्ट आक्षेप नोंदवलेला नाही. त्यावरुन अर्जदार हिने प्रस्तुत खटल्यामध्ये देखिल तिच्या प्रथम विवाहबाबतची माहिती न्यायालयासमक्ष सादर केलेली नसल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते.

१०. अर्जदार हिने तिच्यावर मासिक पाळीच्या कारणावरुन छळ करित असल्याचा आरोप केलेला आहे, त्याच कारणावरुन सामनेवाला याने देखिल अर्जदार ही शारिरिक संबंध ठेवु देत नव्हती असा प्रत्यारोप केलेला आहे. सदर आरोप प्रत्यारोप पुराव्याअंती शाबीत झाल्यानंतर त्याबाबत कोणताही निष्कर्श निघु शकेल. केवळ कथनावरुन त्याबाबत कोणताही निष्कर्श काढणे संयुक्तीक ठरणारे नाही. अर्जदार हिने तिला सन २०१९ मध्ये माहेरी हाकलुन दिल्यानंतर आई व नातेवाईकांमार्फत नांदण्याचा भरपुर प्रयत्न केलयाचे मोघमपणे नमुद केले आहे. याउलट सामनेवाला याने आपल्या खुलाश्यामध्ये स्पष्टपणे अर्जदार हिस वैदयकिय उपचार घेण्याबाबत सांगितल्यावर ती मामाकडे जावुन येते असे सांगुन दिनांक १२/०८/२०१६ रोजी माहेरी निघुन गेल्याचे स्पष्टपणे नमुद केलेले आहे. तसेच त्यानंतर सामनेवाला क्रं.१ याने सर्वप्रथम अर्जदार हिस नांदवण्याकरिता दिनांक २३/०९/२०२० रोजी नोटीस पाठवल्याचे देखिल नमुद केलेले आहे. तदनंतर देखिल सामनेवाला क्रं.१ याने लेवा पाटीदार पंचायत पाडळसे यांच्याकडे वैवाहिक हक्काची जुळणीकरिता अर्ज केला तसेच

दिनांक १२/०७/२०१७, ०५/१२/२०१७, २१/१२/२०१७ रोजी रजिष्टर पोस्टाने पत्र पाठवुन नांदावयास येण्याकरिता कळवले. तदनंतर महिला सहाय्यक कक्ष जळगांव यांच्याकडे दिनांक १३/०१/२०१८ रोजी अर्ज दाखल केल्याचे नमुद केलेले आहे. परंतु अर्जदार ही सदर पंचायतीसमोर व महिला सहाय्यक कक्ष जळगांव यांच्यासमोर हजर झालेली नाही. तसेच पाठवलेल्या पत्रास उत्तर दिलेले नसल्याचे देखिल नमुद केलेले आहे. सामनेवाला क्रं.१ याने खुलाश्याच्या समर्थनात निशाणी क्रं.११ वर शपथपत्र सादर केलेले आहे. वरिल सर्व हकीकत सामनेवाला क्रं.१ याने शपथेवर कथन केलेली आहे. सदर बाब अर्जदार यांच्या विधिज्ञांनी आपल्या युक्तीवादामध्ये नाकरलेली नाही. त्यावरुन सामनेवाला क्रं.१ याने तारखेसहीत अर्जदार हिस नांदवण्याकरिता कोणते प्रयत्न केले याचा तपशिलवार खुलासा केलेला असल्याचे दिसुन येते. याउलट अर्जदार हिने सामनेवाला क्रं.१ याच्याकडे नांदण्याबाबत केलेले प्रयत्नाबाबतचे कथन हे मोघम स्वरुपाचे असल्याचे दिसुन येते. तसेच सामनेवाला याने घेतलेल्या बचावाचा व नांदवण्यास केलेल्या प्रयत्नाचा विचार करता अर्जदार हिचा कौटूंबिक छळ झाल्याबाबतचा सकृतदर्शनी खटल्यावर शंका निर्माण होते.

११. तसेच सामनेवाला क्रं.१ याने सादर केलेल्या एच. एम. पी. क्रं.२५४/२०२२ च्या अर्जाचे अवलोकन केले असता त्यामध्ये देखिल या खटल्यामध्ये नमुद केल्याप्रमाणे कथन सामनेवाला याने केल्याचे दिसुन येते. तसेच तो

खटला दिनांक १४/१२/२०२२ रोजी दाखल केलेला असल्याचे देखिल दिसुन येते. सामनेवाला क्रं.१ याने अर्जदार हिस नांदवण्याचा सर्वात शेवटचा प्रयत्न दिनांक १३/०१/२०१८ रोजी महिला सहाय्यक कक्ष जळगांव यांच्याकडे अर्ज दाखल करुन केलेला असल्याचे दिसुन येते. सामनेवाला कं.१ याने सदर घटस्फोटाचा खटला हा त्यानंतर दाखल केलेला असल्याचे स्पष्ट होते. त्यावरुन सामनेवाला क्रं.१ याने घटस्फोटाचा खटला दाखल करण्यापुर्वी अर्जदार हिस नांदवण्याचा प्रयत्न केल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते. त्यामुळे जरी सामनेवाला क्रं.१ याने घटस्फोटाचा खटला दाखल केला असला तरी त्यावरुन सामनेवाले क्रं.१ व २ यांनी अर्जदार हिचा कौटूंबिक छळ केला असा निष्कर्श निघत नाही. अर्जदार हिने प्रस्तुतचा खटला दिनांक १३/०४/२०२३ रोजी दाखल केलेला आहे. अर्जदार हिच्या कथनानुसार तिला सन २०१९ मध्ये माहेरी हाकलुन दिलेले आहे. परंतु तिने मागील चार वर्षापासुन पोटगी मागणीकरिता कोणताही अर्ज का दाखल केला नाही याचा खुलासा केलेला नाही. अर्जदार हिने प्रस्तुतचा अर्ज सामनेवाला याने घटस्फोटाचा खटला दाखल केल्यानंतर सुमारे पाच महिन्याने दाखल केलेला असल्याचे दिसुन येते. त्यामुळे सामनेवाला याने दाखल केलेल्या घटस्फोटाच्या खटल्यास शह देण्यासाठी प्रस्तुतचा खटला दाखल केला आहे काय अशी शंका निर्माण होते. वरिल सर्व परिस्थितीचा विचार करता सामनेवाला क्रं.१ व २ यांनी अर्जदार हिचा कौटूंबिक छळ केला आहे असा सकृतदर्शनी

निष्कर्श काढण्या इतपत पुरावा अभिलेखावर आलेला नाही. अर्जदार हिस उदरनिवार्हाकरिता एच.एम.पी.क्रं.२५४/२०२२ मध्ये दरमहा रु.३ हजार प्रमाणे अंतरिम पोटगी मंजुर करण्यात आलेली आहे. तसेच समानेवाला याने सादर केलेल्या ७/१२ उता–यांचे अवलोकन केले असता अर्जदार हिचे नाव मालकी हक्कासदरी इतर लोकांसोबत सामाईकात असल्याचे दिसुन येते. तसेच सदर ७/१२ उता–यावर पिकाची नोंद असल्याचे देखिल दिसुन येते त्यावरुन अर्जदार हिस सदर शेत मिळकतीतुन उत्पन्न मिळत असल्याचा अंदाज लावला जावु शकतो. याउलट अर्जदार हिने सामनेवाला याच्या उत्पन्नाबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर सादर केलेला नाही. तसेच घर भाडयापोटी मिळणा–या उत्पन्नबाबत देखिल कोणताही सकृतदर्शनी पुरावा अभिलेखावर सादर केलेला नाही. त्यामुळे अर्जदार ही सामनेवाला क्रं.१ याच्यापेक्षा हलक्या प्रतिचे जिवन जगत असल्याचा निष्कार्श काढता येणार नाही. यदाकदाचित खटल्याचा अंतिम निकालाच्यावेळी सामनेवाला क्रं.१ व २ यांनी अर्जदार हिचा छळ केल्याचे शाबीत झाले तर त्यावेळी अर्जदार ही प्रस्तुत खटला दाखल झाल्यापासुन पोटगीची मागणी करु शकते. वरिल सर्व परिस्थितीचा विचार करता अर्जदार हिस अंतरिम पोटगी मंजुर करणे संयुक्तीक नाही. त्यामुळे मुददा क्र.१ व २ यांना नाकरार्थी उत्तर नोंदवुन मुददा क्र.३ साठी खालील आदेश पारित करित आहे.

**आदेश**

अ) अर्ज ना मंजूर करण्यात येतो.

ब) आदेशाची एक प्रत अर्जदार हिस निशुःल्क देण्यात यावी.

स्वा./–
(ए.एच.शेख)
न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग,
(न्यायालय क्र. ३) चाळीसगांव

दिनांकः २२/०४/२०२४